महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर - ४१६००४

**परिपत्रक क्र.कोविमं / शाखा माध्यमिक परीक्षा/ 1258 / दिनांक : ०७/०८/२०१८**

विषय:-इ.१० वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या विषययोजना बाबत.. ..
संदर्भ:-१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे-३०यांचे जा.क्र. मराशैसंप्रप./अविवि/इ.१०वी विषय योजना व मूल्यमापन /२०१८-१९/२७३३ दि.१६/०६/२०१८.
२) क्र.रा.मं./पापुअ/४१५५ दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्र.

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या व कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, विद्याप्राधिकरणामार्फत इ.१० वी चा अभ्यासक्रम पुनर्रचित करुन विषय योजना तसेच मूल्यमापन योजनेत बदल करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने पाठ्यपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत. त्याची अंमलबजावणी इ.१० वी साठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु होत आहे. अभ्यासक्रम पुनर्रचनेच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये पुनर्रचित अभ्यासक्रम,विषय योजना,मूल्यमापन आणि तासिका नियोजनाबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने हे परिपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) <u>माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT)</u> या विषयाचा समावेश एकात्मिक स्वरुपात सर्व विषयामधून केला असल्याने जून २०१७ पासून इ.९ वी व जून २०१८ पासून इ.१० वी साठी स्वतंत्र विषय बंद होत असल्यामुळे सदर विषयात मार्च-२०१८ च्या परीक्षेअखेर इ.१० वी मध्ये सदर विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोनच संधी उपलब्ध राहतील.

२) सामान्य गणित हा विषय जून २०१७ पासून इ.९ वी व जून २०१८ पासून इ.१० वी साठी बंद होत असल्यामुळे सदर विषयात मार्च-२०१८ च्या परीक्षेअखेर इ.१० वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोनच संधी उपलब्ध राहतील.

३) भाषा विषयात अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी जुलै २०१८ व मार्च २०१९ च्या इ.१० वी परीक्षेस पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ झाल्यास अशा परीक्षार्थी विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ होणे अनिवार्य आहे.

४) <u>गणित (बीजगणित व भूमिती):-</u>

I) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी पुनःश्च गणित विषयाच्या परीक्षेस प्रविष्ठ झाल्यानंतर आधीच्या वर्षाचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण शाळेने पाठवावयाचे असल्यामुळे याबाबतचे रेकॉर्ड शाळेने जपून ठेवणे आवश्यक आहे.

II) खाजगी विद्यार्थी:-(PRIVATE CANDIDATE) खाजगी विद्यार्थ्यांसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे गणित स्वाध्याय पुस्तिकेस २० गुण असतील. स्वाध्याय पुस्तिका संपर्क केंद्रावर विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात येतील. केंद्रप्रमुखांनी स्वाध्यायपुस्तिका तपासण्याची व्यवस्था करावी व प्रचलित पध्दतीचा अवलंब करावा.

५) <u>विज्ञान आणि तंत्रज्ञान:-</u>

I) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षेबरोबर पुनःश्च होणार आहे.

II) खाजगी विद्यार्थी:-(PRIVATE CANDIDATE ) विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाच्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे होणार आहे.

६) **सामाजिक शास्त्रे:-**

I) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी (अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी) सामाजिक शास्त्रे विषयास इ.१० वी परीक्षेस पुनर्परीक्षार्थी म्हणून परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास लगतच्या वर्षांचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण शाळेने पाठवावयाचे असल्यामुळे याबाबतचे रेकॉर्ड शाळेने जपून ठेवणे आवश्यक आहे.

II) खाजगी विद्यार्थी:-(PRIVATE CANDIDATE ) खाजगी विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने सामाजिक शास्त्रे या विषयासाठी अंतर्गत मूल्यमापनाचे गुण असणार नाहीत.

७) दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत:-माध्यमिक स्तरावरील इ.९ वी च्या/१० वी च्या विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत राज्य मंडळाने परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/वि.ग.अ.वि. (दिव्यांग) वि.वि.यो./मू.यो./३२९० दि.२२ जून २०१८ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामध्ये मुख्यत: कार्यशिक्षण या विषयाची माहिती दिली आहे. नियमित विद्यार्थ्यांना कार्यशिक्षण विषय घेता येणार नाही. फक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विषय योजनेप्रमाणे कार्यशिक्षण अंतर्गत असलेल्या एकूण ९ विषयांपैकी कोणत्याही एका विषयाला पर्यायी विषय म्हणून घेता येईल.

८) **पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी जून्या अभ्यासक्रमाची परीक्षा देण्याची संधी:-**

१० वी पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु होत असल्यामुळे मार्च-२०१८ च्या परीक्षेअखेर उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोन संधी उपलब्ध राहतील. त्यामध्ये काही विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास मात्र त्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार परीक्षेस प्रविष्ठ व्हावे लागेल.
वरील सर्व सूचना आपल्या विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.कोल्हापूरविभागीय मंडळाच्याwww.sscboardkolhapur.in या संकेतस्थळावर त्याचबरोबर, राज्यमंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in याही संकेतस्थळावर तसेच विद्या प्राधिकरण व बालभारतीच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत:- :- माध्यमिक स्तरावरील इ.९ वी च्या/१० वी च्या विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत राज्य मंडळाचे परिपत्रक.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद सातारा, सांगली व कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**सर्व्हे नं ८३२ ए, फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.**

फो.नं.०२०-२५७०५००० ई-मेल secretary.stateboard@msbshsc.ac.in फॅक्स नं.०२०-२५६६५८०७


४८७

# परिपत्रक

**परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषययोजनेबाबत/ मूल्यमापन योजना / ३२९०पुणे, दिनांक : २२/६/२०१८**

विषय - माध्यमिक स्तरावरील इ.९वीच्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१५/(११९-अ)/एस.डी.६, दि.०८ जानेवारी,२०१६

२. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१५/११९-अ/एस.डी.६, दि.१५ फेब्रुवारी,२०१६

३. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.१९५/१६/एस.डी.६, दिनांक ११ जानेवारी, २०१६

४. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम, विषययोजना व तासिका नियोजन/२२२७, दिनांक २७/४/२०१७.

५. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम/ मूल्यपान योजना/ ३६२५, दिनांक १२/७/२०१७.

६. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम / विषययोजना, तासिका नियोजन व मूल्यमापन योजना/ ३९६०, दिनांक २८/७/२०१७.

७.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना/४३४३ पुणे४,दि.१८/०८/२०१७.

८.शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१६/(२४९/१६)/एसडी-४, दि.६ ऑक्टोबर, २०१७.

९. या कार्यालयाचे परिपत्रक क.रा.मं../संशोधन/विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना/५२६४ पुणे४, दि.१८ ऑक्टोबर, २०१७.

या परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना / मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, इ.९वीसाठी विशेष गरजा असलेल्या दृष्टीबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, बहुविकलांग (स्पॅस्टिक), ऑटिस्टिक (स्वमग्न), सेरेबल पाल्सी, मतिमंद, गतिमंद इत्यादी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मंडळाने विषय योजना, अभ्यासक्रम तयार केला आहे. तसेच उपरोक्त संदर्भीय परिपत्रके आपणांस यापूर्वीच पाठविण्यात आलेली आहेत. विशेष गरजा असलेल्या "दिव्यांग" विद्यार्थ्यांसाठी अनेक सोयी सवलती. मंडळाने यापूर्वीच वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली आहेत त्याप्रमाणे सध्या कार्यवाही सुरु आहे, हे आपणांस विदित आहेच.

कर्णबधिर, अंध, अपंग, दृष्टीदोष असलेल्या व अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर (७६) (इ.७वीचे अंकगणित)" आणि "कार्यानुभव" विषय घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. "अंध" विद्यार्थ्यांना फक्त "गणिताबरोबर" (इ ७ वीचे अंकगणित) आणि "कार्यशिक्षणाच्या

विषयातील कोणताही एक विषय" घेता येईल. "कर्णबधिर" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "बहुविकलांग" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "अध्ययन अक्षमता" असलेल्या विद्यार्थ्यांना " **दोन भाषांऐवजी**" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "ऑटिस्टीक" विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण विषयांतर्गत ९ विषयांपैकी विषय" निवडण्याची सोय आहे. "कार्यशिक्षण या विषयातील पुढे नमूद केलेल्या ०९ विषयांपैकी कोणताही एक विषय" विषयाला पर्याय म्हणून घेता येईल.

१. **घरगुती विद्युत उपकरणे - (J-1)**
२. **दूध व दूधाचे पदार्थ - (J-5)**
३. **हस्तभरतकाम - (J-9)**
४. **शिवणयंत्राद्वारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती - (K-1)**
५. **टाकाऊ वस्तूंपासून सौंदर्यकृती - (K-5)**
६. **पाककला - (L-7)**
७. **भारतीय संगीत - (M-3)**
८. **चित्रकला व रंगकाम - (M-6)**
९. **कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तक बांधणी - (M-7)**

जून २०१२ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. परंतु हे सर्वच विषय "विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थी" त्यांच्यातील शारीरीक दोषांच्या कमतरतेमुळे विषय परिचित झालेले आहेत. (त्यामुळे यावर्षी इ.९वीच्या वर्गात जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत, त्यांना या "कार्यशिक्षण" विषयाबाबत शाळेत या विषयांतर्गत जो विषय श्रेणीसाठी शिकविला जात होता, त्याबाबत संपूर्ण माहिती असणार आहे. त्यांची परीक्षा ही त्या त्या शाळेत मंडळ नियमाप्रमाणे घेण्यात यावी. परंतु ज्या "विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी" हा "कार्यानुभव विषय" "भाषेसाठी पर्यायी विषय" म्हणून घेतला असेल, तर त्या विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा आयोजित करावी. (कारण अनेक विशेष शाळेत (special school) या पुस्तकेतील अभ्यासक्रमाप्रमाणे शिकविले जात आहे.))

इ. १० वीच्या प्रचलित भाषा विषय योजनेत कोणताही बदल केलेला नाही. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची नवीन मूल्यमापन योजना मंडळाने तयार केलेली आहे. विशेष गरजा असलेले जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यांना फक्त कार्यशिक्षण या विषयाची मूल्यमापन योजना प्रचलित प्रमाणेच राहील, त्यात कोणताही बदल नाही. परंतु, विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनी भाषाऐवजी गणित या विषयाबरोबर कार्यशिक्षणातील कोणताही विषय भाषेला

किंवा गणिता बरोबर पर्याय म्हणून घेतलेला असेल तर, त्याच विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन योजना लेखी गुण - २५, वार्षिक काम - २५, व प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण अशी एकूण १०० गुणांची राहील.

"विज्ञान आणि तंत्रज्ञान" या विषयासाठी शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र हा पर्यायी विषय अभ्यासण्याची, प्रचलित पध्दतीप्रमाणेच सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शरीरशास्त्र भाग-१ ३० गुण, गृहशास्त्र ३० गुण, प्रयोगपरीक्षा २० गुण, २० गुण कृतिपुस्तिका याप्रमाणे एकूण १०० गुणांची राहील.

परंतु इ.१०वी साठी जे नियमित विदयार्थी कार्यशिक्षण विषयात अनुत्तीर्ण झालेले आहेत. त्या विदयार्थ्यांना नियमाप्रमाणे शेवटच्या दोन संधी (जुलै २०१८ / मार्च २०१९) उपलब्ध असणार आहेत. याची नोंद घ्यावी.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ९वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात सुरू झालेली आहे. तसेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इ.१०वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात यावी.

तरी, आपल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या निदर्शनास सदर बाब आणावी. परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदर परिपत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

आदेशान्वये Issued on Despatch Clerk State Board, Pune

प्र. सचिव
राज्यमंडळ,पुणे

प्रति,

विभागीय सचिव,
पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण विभागीय मंडळ,
पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण.

**यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/ विद्यालय प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.**

- प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १.
२. मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे १.
४. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.
५. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
७. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परीषद.
८. शाखा - परीक्षा, पापुअ, पापुई, ऑनलाईन, ग्रंथालय, मा.अध्यक्षांचे अस्विस, मा.सचिवांचे अस्विस.